# <u>नवी मुंबई महानगरपालिका</u>

**महानगरपालिका सचिव कार्यालय, नवीन मुख्यालय, 3रा मजला, बेलापूर, नवी मुंबई 400614.**

**-: <u>सर्वसाधारण सभेची नोटीस</u> :-**

**दिनांक : 12/03/2018.**

नवी मुंबई महानगरपालिकेची **<u>मार्च महिन्याची सर्वसाधारण सभा, मंगळवार, दिनांक 20 मार्च 2018 रोजी सकाळी 11.00 वाजता</u>** बेलापूर, भुखंड क्रमांक 01, सेक्टर 15ए, नवी मुंबई महानगरपालिका, नवीन मुख्यालय येथील 5 व्या मजल्यावरील **<u>राजमाता जिजाऊ सभागृह</u>** येथे खालील विषयांवर विचार करण्यासाठी भरेल :-

**1.** इतिवृत्त.

**2.** प्रश्नोत्तरे.

**<u>आयुक्तांकडील प्रस्ताव :</u>**

**3.** स्व. आर. आर. पाटील उद्यान से. 19अे नेरूळ व अॅम्युझमेंट पार्क से. 26 कोपरी गांव वाशी येथील उद्यानाचे संवर्धन संरक्षण करणेबाबत निविदा मागविणे.

**4.** वाशी सेक्टर 10ए येथील प्रथम संदर्भ रूग्णालय इमारतीचे रंगरंगोटी व सुधारणा करणे.

**5.** तुर्भे से.22 येथील रामतनुमाता मैदान व तलावाच्या परिसरातील हेवी ड्युटी S.W.Drain बांधणे व रस्त्याची डांबरीकरणाने सुधारणा करणे.

**6.** तुर्भे विभागातील टीटीसी औद्योगिक क्षेत्रातील सी ब्लॉक मधील भु.क्र. सी/66 मॅक स्प्रिंग प्रा.लि. ते. भु.क्र.सी/62/1 पर्यंत ड्रेनची सुधारणा करणे.

**7.** तुर्भे सेक्टर- 19 व 20 येथील अन्नपुर्णा चौक ते पुनित कॉर्नर व फळ मार्केटच्या परिसरातील पदपथाची सुधारणा करणे.

8. तुर्भे विभागातील क्षेपणभूमीलगत टी.टी.सी. औद्योगिक क्षेत्रापासून ते तुर्भे स्टोअर पर्यंत रस्त्याची डांबरीकरणाने सुधारणा करणे.

**9.** ऐरोली प्र.क्र. 22 से. 8ए येथे अपुर्वा सोसा. ते कामाठी प्लाझा, यश पॅराडाईझ ते गुरूकूल सी.एच.एस. व ईडन पार्क ते गणपती बाप्पा चौक पर्यंत आर.सी.सी. गटर बांधून सुधारणा करणे.

**10.** बेलापूर विभागातील नेरूळ येथील गणपतशेठ तांडेल मैदान विकसित करणे.

**11.** नवी मुंबई हद्दीतील कोपरखैरणे येथील कातकरीपाडा आदिवासी घटकांसाठी प्रस्तावित घरकुल योजना.

**12.** कोपरखैरणे विभागात माता बाल रुग्णालयाकरीता जागा उपलब्ध करणे.

**13.** नेरुळ, कुकशेत, सेक्टर-14, येथे भूखंड क्र. पी-11 या ठिकाणी उभारण्यात आलेली व्यायामशाळा ही वास्तु कुकशेत ग्रामस्थ व ग्रामस्थांच्या संस्थांना 05 वर्षे कालावधीकरीता लिव्ह अॅण्ड लायसन्स् तत्वावर उपलब्ध करुन देणे.

**14.** नावाळी (दहिसर) येथील माता बाल रुग्णालयाची जागा जिल्हा परिषद ठाणे यांचेकडे वर्ग करणे.

**15.** नवी मुंबई महानगरपालिकेच्या स्थापत्य विषयक विकास कामांसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडील राज्यस्तरावरील राज्य दरसूची (SSR for year 2017-18) वापरणे.

**16.** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 376, प्रकरण 18 मधील भाग 4 अनुसुची ड नुसार समाविष्ट व्यवसायांच्या व्यवसाय परवाना शुल्कात वाढ करणे.

**17.** नामकरण करणे.

**18.** बहुउद्देशिय इमारतीमधील जागा विविध प्रयोजनासाठी भाडेतत्वावर देणे.

**19.** नवी मुंबई महानगरपालिकेच्या एकूण 13 जुन्या नादुरुस्त कार वाहनांचे निर्लेखन करणे.

**<u>ठरावाच्या सूचना</u> :**

**20 ते 22. श्रीम. सरोज रोहिदास पाटील, यांजकडून :-**

**(20)** प्रभाग क्र. 101 सेक्टर-23 भुखंड क्रं.10 शाळेकरीता राखीव असलेल्या भुखंडावर शाळेची इमारत बांधणे.

**(21)** प्रभाग क्र. 101 मधील कोकणभवन येथील पार्कीग शेजारी असलेल्या भुखंड क्र.15 सेक्टर 10 येथील लायब्ररीसाठी आरक्षित असलेल्या भुखंडावर लायब्ररी बनविणे.

**(22)** प्रभाग क्र. 101 मधील आग्रोळी गाव येथील नमुंमपा शाळा क्र.3 येथे 1 मजला वाढीव बांधकाम करणे.

**23 ते 25. श्री. किशोर अशोक पाटकर, यांजकडून :-**

**(23)** नवी मुंबई मधील नागरिक मग ते प्रकल्पग्रस्त, माथाडी, सर्वसाधारण नागरिक किंवा व्यावसायिक असोत, त्यांनी जर एखादे बांधकाम करण्याकरिता बांधकाम परवानगी घेतलेली आहे व बांधकाम पूर्ण झाल्यानंतर नवी मुंबई महानगरपालिकेकडे भोगवटा प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे, मात्र सिडको व नवी मुंबई महानगरपालिकेच्या दिरंगाईमुळे भोगवटा प्रमाणपत्र न मिळाल्यामुळे सदर जागेत वास्तव्य सुरू केले आहे. अश्या नागरिकांना नवी मुंबई महानगरपालिकेने दंडात्मक कारवाई करू नये, त्यांचे अतिरिक्त शुल्क माफ करावे. सिडको महामंडळ त्यांनी संमत केलेल्या ठराव क्रमांक 11885 मधील तरतूदीनुसार त्यांच्याकडून झालेल्या दिरंगाई किंवा चुकीमुळे नागरिकांना दंड आकारत नाहीत. तसेच अतिरिक्त लिज प्रिमियमदेखील आकारत नाहीत. नवी मुंबई मनपाचे माननीय आयुक्त साहेब देखील सिडकोच्या संचालक मंडळाचे पदसिध्द सदस्य आहेत. त्यामुळे त्यांनी त्याच धर्तीवर नवी मुंबई महानगरपालिकेमध्ये नियम अथवा ठराव पारित करून समस्त नवी मुंबईकर नागरिकांना त्यांची चुकी नसताना बांधकामापोटी जी अतिरिक्त दंडाची रक्कम अदा करावी लागते त्यातून दिलासा देणे. **(24)** नवी मुंबई महानगरपालिकामार्फत महानगरपालिका क्षेत्रात राहणाऱ्या नागरिकांना मोफत अंत्यविधीची सुविधा प्रदान करण्यात येत आहे. मात्र ही सुविधा फक्त नवी मुंबई मनपा संचलित स्मशानभूमीमध्ये प्रदान करण्यात येते जिथे अंत्यविधी अग्निसंस्कार करून दिले जातात. नवी मुंबईत असे घटक आहेत जे नवी मुंबई मनपाचे करदाते आहेत मात्र ते त्यांच्या जाती धर्मातील रिवाजाप्रमाणे मृत व्यक्तींचे अंतिम संस्कार करतात, त्याकरिता त्यांनी सिडकोकडून भूखंड उपलब्ध करून घेतलेले आहे. मात्र काही समाजाच्या स्मशानभूमी / दफनभूमीमध्ये मयताचा अंत्यविधी करताना खूप अडचणी येतात. त्यासाठी त्यांना स्वत:च सर्व खर्च करावा लागतो. तरी नवी मुंबई महानगरपालिकेने अशा इतर स्मशानभूमीमध्ये देखील मनपामार्फत मोफत अंत्यविधी सुविधा उपलब्ध करून देणे. **(25)** सदर ठरावाच्या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिकेमध्ये माहिती अधिकार कार्यकर्ते अर्ज करतात, त्याची यादी नवी मुंबई महानगरपालिकेने त्यांच्या संकेत स्थळावर (Portal) प्रसिध्द करणे.

**26 ते 28. श्रीम. रूपाली किस्मत भगत, यांजकडून :-**

**(26)** प्रभाग क्र. 19, नेरूळ सेक्टर-18 येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे आकर्षक प्रवेशद्वार बांधण्यात यावे व त्यास छत्रपती शिवाजी महाराज चौक प्रवेशद्वार असे नामकरण करणे. **(27)** प्रभाग क्र. 19, नेरूळ सेक्टर-16ए, 16 व 18 येथील न.मुं.म.पा. परिवहन उपक्रमाचे जुने बस थांबे आवश्यक सुविधायुक्त आकर्षक बनविणे. **(28)** प्रभाग क्र. 19, नेरूळ सेक्टर-16, न्यु मंगलमुर्ती सोसायटी समोरील गटाराचे छत कमकुवत झाले असून सदर गटारावरील छत कोणत्याही क्षणी कोसळून जिवीतहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी स्थानिक नागरिकांचे सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून सदर ठिकाणा वरील गटार नव्याने बांधणे.

**29 ते 31. श्रीम. मोनिका लक्ष्मीकांत पाटील, यांजकडून:-**

**(29)** प्रभाग क्र.28, घणसोली, अंतर्गत तळवली गावातील नामदेव पाटील चाळ ते करजूआई मंदिरापर्यंत, पावसाळी हेव्ही ड्युटी गटर्स बांधणे. **(30)** प्रभाग क्र. 28, घणसोली अंतर्गत रस्त्यांची सुधारणा करणे. **(31)** प्रभाग क्र.28, घणसोली अंतर्गत आवश्यक तेथे ओपन जीम उभारणे.

**32 ते 34. श्री. लक्ष्मीकांत नामदेव पाटील, यांजकडून :-**

**(32)** प्रभाग क्र. 27, घणसोली, अंतर्गत से.25 मध्ये हेवी ड्युटी गटर्स व पावसाळी गटर्स बांधणे. **(33)** प्रभाग क्र. 27, घणसोली अंतर्गत फुटपाथ व रस्त्यांची सुधारणा करणे. **(34)** प्रभाग क्र. 27, घणसोली अंतर्गत मच्छीमार्केट ते ओव्हर हेड पाण्याच्या टाकीपर्यंत रस्त्यांची दुरूस्ती व डांबरीकरण करून सुधारणा करणे.

**35 व 36. श्री. विशाल पोपट ससाणे, यांजकडून :-**

**(35)** प्रभाग क्र. 82, जुईनगर, सेक्टर-24 येथील पदपथ, रस्ते व गटारांची दुरूस्ती करणे. **(36)** प्रभाग क्र. 82, जुईनगर सेक्टर-25 येथील गणेश मैदानाची दुरूस्ती करून सुशोभिकरण करणे.

**37 ते 39. श्री. रामदास बबनराव पवळे, यांजकडून :-**

**(37)** प्रभाग क्र. 49, कोपरखैरणे मधील गटारावरील पेव्हर ब्लॉक खराब झाले आहेत ते बदली करणे. **(38)** प्रभाग क्र.49, कोपरखैरणे मधील 12डी रामनगर येथील पावसाळी गटारांची सुधारणा करणे. **(39)** प्रभाग क्र. 49, कोपरखैरणे सेक्टर 9 येथील साईनाथ, साईकृपा हौसिंग सोसायटीच्या बाजूला वाचनालय बांधून देणे.

**40 ते 42. श्रीम. संगिता संदिप म्हात्रे, यांजकडून :-**

**(40)** प्रभाग क्र. 45, कोपरखैरणे मधील राजधानी स्वीट ते चिकणेश्वर डेपो मुख्य रस्त्यावरील पदपथांची सुधारणा करणे. **(41)** प्रभाग क्र.45,कोपरखैरणे मधील नवीन माथाडी हॉस्पिटल ते टॅक्सी स्टॅंड सेक्टर-6 समोरील पदपथांची सुधारणा करणे. **(42)** प्रभाग क्र.45,कोपरखैरणे चिकणेश्वर उद्यान सेक्टर 3 मधील पदपथ स्टॅंप कॉंक्रीटचे करणे.

**43 ते 45. श्रीम. दिपा राजेश गवते, यांजकडून :-**

**(43)**"Green World ते कृष्णा हॉटेल या गणपतीपाड्यातील स्थळी Over Foot Bridge लोकांना रस्ता ओलांडण्यासाठी बांधणे. **(44)** गणपतीपाडा, महात्मा फुलेनगर, सावित्रीनगर, आंबडेकरनगर, दुर्गानगर, गणेशनगर व बिंदू माधवनगर येथे कमी दाबाने पाणी पुरवठा जुन्या जल वाहिन्यावरून होत आहे. ज्या कमी व्यासाचे आहेत.त्याऐवजी 150mm व्यासाच्या जलवाहीन्या टाकणे. **(45)** गणपतीपाडा, सावित्रीनगर, महात्मा फुलेनगर येथील H.T.(उच्च दाब) व L.T. (लघु दाब) चे विद्युत वाहिन्या भुमिगत करणे.

**46 ते 48. ॲड. श्रीम. अपर्णा नवीन गवते, यांजकडून :-**

**(46)** प्रभाग क्र. 9, दिघा येथील संजय गांधीनगर नामदेवनगर, दिघा या विभागात मलनि:स्सारण वाहीन्या टाकणे. **(47)** संजय गांधी नगर हा दिघ्याचाच एक भाग असून त्याची सर्व प्रशासकीय कामे "जी" विभाग कार्यालय ऐरोली येथूनच होतात. त्यामुळे नागरीकांचा वेळ व पैसा वाया जात आहे. तरी संजय गांधीनगर हा विभाग प्रशासकीय कामासाठी व नागरीकांच्या सुलभतेसाठी "एच" विभाग कार्यालय दिघा येथे वर्ग करणे. **(48)** प्रभाग क्र. 9, दिघा गावात असलेल्या बहुउददेशिय इमारतीतील जागा वाचनालयासाठी जागा अपुरी पडत असून सदर इमारतीवर तिसऱ्या वाढीव मजल्याचे बांधकाम करणे.

**49 ते 51. श्री. नवीन मोरेश्वर गवते, यांजकडून :-**

**(49)** प्रभाग क्र. 04 दिघा, साठे नगर येथील OS-1 भूखंडावर इयत्ता 1 ली ते इयत्ता 10 वी पर्यंत प्राथमिक व माध्यमिक शाळा, नागरी आरोग्य केंद्र (UHP) व उच्च क्षमतेचे पाणी साठवणूक क्षमतेचे उच्चस्तरीय व भूमिगत जलकुंभ बांधणे. **(50)** प्रभाग क्र. 04 दिघा, साठे नगर, विष्णूनगर, विजयनगर, रामजी आंबेडकर नगर, पंढरीनगर व दिघा (पूर्व) या भागात मलनि:स्सारण वाहीन्या टाकणे. **(51)** प्रभाग क्र. 04 दिघा, पंढरीनगर येथील गट नं. 147 मौजे दिघा येथे आमचे कुटुंबियांचे मालकी हक्काचे जागेवर G+2 बहुउददेशिय इमारत बांधणे.

**52 ते 54. श्री. मुनावर पटेल, यांजकडून :-**

**(52)** प्रभाग क्र. 55, खैरणे गाव येथे महावीर वैभाव बिल्डिंग ते आझाद मैदान पर्यंत व सावरिया डेरी ते खैरणे कब्रस्तानपर्यंत गटार फुटपाथची सुधारणा करणे. **(53)** प्रभाग क्र. 55, सेक्टर 11 कोपरखैरणे येथील मोठ्या नाल्याची मान्सुनपूर्वी साफ-सफाई करणे. **(54)** प्रभाग क्र. 55, येथील उर्दु शाळा क्र.81 खैरणे गांव, नाव दर्शविणारा इलेक्ट्रिक डिजिटल बोर्ड लावणे.

**55 व 56. श्री. रमेश चंद्रकांत डोळे, यांजकडून :-**

**(55)** नवी मुंबईमध्ये आदिवासी समाजासाठी सिडकोच्या आरक्षित जागेमध्ये आदिवासी भवन बांधण्याकरिता भूखंड उपलब्ध करून देणेबाबत. नवी मुंबईमधील स्थानिक प्रकल्पग्रस्त आदिवासींची जागा सिडको व MIDC ने विकास कामांसाठी विकत घेतली आहे. नवी मुंबईतील आदिवासी समाज गरीब असून आदिवासी समाजातील नागरिकांना सांस्कृतिक, सामाजिक व शैक्षणिक कार्यक्रम करण्यास जागा उपलब्ध नसल्याने मोठ्या अडचणी निर्माण होत आहे. तरी नवी मुंबईमध्ये आदिवासी समाजासाठी आदिवासी भवन बांधणे. **(56)** प्रभाग क्र. 26 महापे मधील अडवली भुतावली गावातील नमुंमपा शाळा क्र. 41 या शाळेत अडवली भुतावली गावातील MIDC भागातील, तसेच झोपडपटटी व क्वॉरी भागातील गरीब व गरजू विदयार्थी येथे शिक्षण घेत आहेत. या शाळेत 8 वी पर्यंत वर्ग असून येथील एकूण विदयार्थी संख्या बालवाडी ते 8 वी पर्यंत 485 इतकी आहे. सदर ठिकाणी 8 वी पर्यंत वर्ग असून पुढील शिक्षणासाठी येथील विदयार्थ्यांना महापे, कोपरखैरणे घणसोली येथे जावे लागते. या शाळेतून पुढील शिक्षणासाठी जाणारे विद्यार्थी गरीब असून त्यांना महापे गावातील शाळेत पायी जावे लागत असून त्यांना अनेक रस्ते ओलांडून जावे लागते, रस्ते ओलाडतांना अनेक विदयार्थ्यांचे अपघात सुध्दा झाले आहेत. या शाळेत तिसरीच्यौ वर्गात 74 विदयार्थी एकाच वर्गात शिक्षण घेत आहेत.

सदर ठिकाणी दोन वर्गातील विदयार्थी एकाच वर्गात बसत असून येथे वर्ग वाढवण्याचे गरजेचे आहे. नमुंमपा शाळा क्र.41 अडवली भूतावली शाळेतील पटसंख्या खालीलप्रमाणे आहे.

| पटसंख्या | | | |
|---|---|---|---|
| इयत्ता | मुले | मुली | एकुण |
| बालवाडी | 19 | 29 | 48 |
| खेळवाडी | 11 | 14 | 25 |
| 1 ली | 37 | 29 | 66 |
| 2 री | 29 | 22 | 51 |
| 3 री | 33 | 41 | 74 |
| 4 थी | 32 | 21 | 53 |
| 5 वी | 23 | 33 | 56 |
| 6 वी | 26 | 21 | 47 |
| 7 वी | 10 | 20 | 30 |
| 8 वी | 13 | 22 | 35 |
| एकुण | 233 | 252 | 485 |

तरी येथील शाळेत दहावीपर्यंत वर्ग करण्यात यावे व येथील वर्ग वाढविणे.

**57 ते 59. श्रीम. लता भालचंद्र मढवी, यांजकडून :-**

**(57)** प्रभाग क्र. 47, कोपरखेरणे मध्ये एल.ई.डी. स्ट्रीटलाईट बसविणे. **(58)** प्रभाग क्र. 47, कोपरखैरणे मधील न.मुं.म.पा. 31 व 114 च्या क्रिडांगणामध्ये लाल माती टाकणे. **(59)** प्रभाग क्र. 47, कोपरखैरणे मधील कै.आण्णासाहेब पाटील मैदानात ओपन जीम बसविणे.

**60 ते 62. श्रीम. उज्वला विकास झंजाड, यांजकडून :-**

**(60)** प्रभाग क्र. 01, ईश्वरनगर येथील संपूर्ण प्रभागात पावसाळी गटार बांधणे. **(61)** प्रभाग क्र. 01, ईश्वरनगर येथील संपूर्ण प्रभागात अंतर्गत रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे. **(62)** प्रभाग क्र. 01, ईश्वरनगर येथील सिध्दीविनायक मंदिर ते मन्नुभाई चाळ मैदानपर्यंत रस्ता बांधून तेथे हेवी ड्युटी गटार बांधणे.

**63. श्रीम. सुनिता रतन मांडवे, यांजकडून :-**

भारतीय रेल्वे, संरक्षण मंत्रालयासह शासनाच्या विविध सार्वजनिक प्राधिकरणांमधून निवृत्त झालेल्या सेवक वर्गास निवृत्ती वेतन व अन्य स्वरूपातील लाभ प्राप्त करण्याकरिता सुरू राहण्याकरीता प्रतिवर्षी संबंधित पात्र व्यक्ती हयात असल्याचे सिध्द करण्याबाबत वैद्यकिय प्रमाणपत्रासह राष्ट्रीयकृत बँकेच्या व्यवस्थापकाने दिलेला दाखला हा विधीग्राहय समजला जातो. असे असतानाही नवी मुंबई महानगरपालिका प्राधिकरणाकडून मात्र सेवा निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यास प्रतिवर्षी मनपाच्या संबंधित विभागातील जबाबदार पालिका सेवकासमोर हयात असल्याचे सिध्द करण्यासाठी उपस्थित राहावे लागते. सदरील प्रकार हा वृध्दत्वाकडे झुकलेल्या व पालिका क्षेत्राबाहेर राहणाऱ्या व्यक्तींना गैरसोईचा व अवमानकारक ठरतो. ही बाब विचारार्थ घेऊन ज्याप्रमाणे केंद्र शासनाच्या प्राधिकरणांकडून निवृत्ती वेतन प्रदान करण्यासाठीचा हयातीचा दाखल ग्राह्य ठरविण्यासाठी जी मार्गदर्शक तत्वे निश्चित केलेली आहेत. त्या मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी नमुंमपाच्या सेवक वर्गाचे निवृत्ती वेतन सुरू ठेवण्यासाठी करण्यात यावे. वरीलप्रमाणे उल्लेखिलेल्या माझ्या सूचना जनहितार्थ विचारार्थ घेऊन त्या सूचनांच्या अंमलबजावणी करण्याकरीता उचित प्रशासकीय कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करणे.

**64 व 65. श्री. हरिश्चंद्र आत्माराम भोईर, यांजकडून :-**

**(64)** प्रभाग क्र. 59, जुहूगांव सेक्टर 11 येथील साईबाबा मंदिर ते कै. सोमा कंबा पाटील निवास, मरिआई माता मंदिर ते स्वामीनारायण मंदिर व स्वामीनारायण मंदिर ते जुहूगांव स्मशानभुमी या रस्त्याचे डांबरीकरण करणे. **(65)** प्रभाग क्र.59, जुहूगांव सेक्टर 11, येथील हनुमान मंदिर ते प्रेमनाथ भोईर बिल्डींग, सपना लॉज ते कै. मोहन भोईर निवास व श्री. रमण भोईर बिल्डींग ते श्री. यशवंत भगत येथे इंटरलॉक बसविणे.

**66. श्री. रविंद्र उध्दव इथापे, यांजकडून :-**

"नवी मुंबई शहर हे आधुनिक शहर म्हणुन संबोधले जाते. सन 1992 सालापासुन आतापर्यंत शहरामध्ये अनेक नागरी सेवा व साधनसामुग्री आपण महानगरपालिकेच्या माध्यमातुन उभारली. ही सर्व साधनसामुग्री आपल्या शहराच्या नावलौकिकात भर टाकणारी अशी आहे. त्यातीलच एक महत्वाचे काम म्हणजे शहराच्या पाण्याच्या व्यवस्थेकरीता सन 2002 साली विकत घेतलेल मोरबे धरण. 2007 सालापासुन त्याचा लाभ नवी मुंबईतील नागरीकांना मिळत आहे. आतापर्यंत इतर कोणत्याही शहरात पाण्याची समस्या उदभवत असली तरी त्याची झळ अध्यापपर्यंत आपल्या नवी मुंबई शहरास आपल्या असलेल्या मोरबे धरणामुळे सोसावी लागलेली नाही. क्रिसीलने आपल्या लोकसंख्या वाढीच्या अनुषंगाने पाण्याच्या क्षमतेचे विश्लेषण केले होते, त्यांनी आपल्या धरणाच्या पाण्याची क्षमता 24 लक्ष लोकसंख्येला पुरेल इतका पाणी साठा असल्याचा अहवाल सादर केला. परंतु लोकसंख्येत झालेली नैसर्गिक वाढ व वास्तविक अहवालातील झालेली वाढ यामध्ये तफावत आहे. आजमीतीस गांवगांवठाणामध्ये गरजेपोटी बांधलेली घरे, झोपडपटटीमध्ये झालेली वाढ, अल्प उत्पन्न गटातील घरांची झालेली वाढ, यामुळे नैसर्गिक लोकसंख्या वाढ जी 2025 साली होणार होती, ती लोकसंख्यावाढ सन 2017 सालीच पुर्ण झाल्याचे निदर्शनास येते. पुनर्विकासामुळे होणारी लोकसंख्या वाढ ही क्रिसीलने दिलेल्या अहवालापेक्षा खुप अधिक होणार आहे. या सर्व बाबींचा विचार करता महानगरपालिकेचा पाण्याचा स्तोत्र कायम स्वरुपी पुरेल असा नाही याचा वेध घेता, नमुंमपाचे सत्ताधारी पक्षाचे सल्लागार मा.श्री.गणेशजी नाईक साहेब यांच्या सुचनेनुसार मी आपल्याला सुचवु इच्छितो कि, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे टाटा पॉवर प्लॅन्टचे जे पाणी डिसचार्ज होऊन पातळगंगा नदीमध्ये सोडले जाते व ते पाणी समुद्राला मिळते, सदरचे पाणी पाईपलाईनव्दारे साधारणपणे 18 किलोमीटर अंतरावर असणा-या नवी मुंबई महानगरपालिकेच्या भोकरपाडा येथील जलशुध्दीकरण केंद्रामध्ये ग्रॅव्हीटीच्या माध्यमातुन आणावे व सदरहु मोरबे धरणातील पाणी जुलै ते सप्टेंबर दरम्यान न वापरता उपरोक्त पाणी वापरावे जेणेकरुन मोरबे धारणातील पाणीसाठा देखील वाढेल व नवी मुंबईची भविष्यातील 50 वर्षाची पाणी समस्या मार्गी लागेल. म्हणुन आपण अशा पध्दतीचा शासकिय प्रस्ताव त्वरीत महासभेत आणणे.

**मा. महापौरांच्या आदेशावरून,**
**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
**महानगरपालिका सचिव,**
**मुंबई महानगरपालिका.**

**महापालिका सचिव कार्यालय,**
**नवी मुंबई महानगरपालिका,**
**दिनांक 12 मार्च 2018.**